**संक्षिप्त फौजदारी केस नं. १४७/२०२४**
**नि. क्र. २१**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ चा जबाब शपथेवर सुरु.</u>**

**नाव** – शौकत हन्नान शेख

**वय**– ४२ वर्षे , **व्यवसाय** – गादी व्यवसाय,

**राहणार**– संगमेश्वर, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून</u> –**

**०१**. दिनांक ०३/०५/२०२४ रोजी मी संगमेश्वर येथे हजर होतो. पोलीसांनी मला ०३ तारखेला बोलावले होते. परंतु, मी त्यादिवशी गेलेलो नाही. दिनांक ०६ रोजी मी जात असताना धामणी येथे मुंबई–गोवा महामार्गावरील ॲक्टीवा शोरुमसमोर पोलीसांनी मला बोलावले होते.

**०२**. त्यावेळी तेथे पोलीस पंचनामा तयार करीत होते. पंचनामा झाल्यावर मी व अमित भाटकर यांनी त्यावर सहया केल्या. बाबु (कोतवडेकर) यांची रिक्षा व दुचाकी यांचा अपघात झाल्याचा सदर पंचनामा होता. त्यातील मजकुर मी वाचला नव्हता. कोतवडेकर यांनीच सदर अपघात झाल्याचे त्यावेळी सांगितले होते. पोलीसांनी सदरचे घटनास्थळ मला त्यावेळी दाखविले. त्यानंतर पोलीसांनी छायाचित्रे घेतली होती. *(साक्षीदारास प्रकरणातील छायाचित्रे दाखविण्यात आली). अनुक्रमांक ०३ ते ०६ कडील छायाचित्रांत मी, पोलीस, दत्तात्रय कोतवडेकर व अमित भाटकर असे आम्ही दिसत आहोत. अनुक्रमांक ०१, ०२ व ०७ कडील छायाचित्रांत दिसत असलेल्या गाडीचाच अपघात झाला होता. सदर छायाचित्रांत दिसत असलेली दुसरी दुचाकी मी पाहिलेली नाही. मी सही करुन तेथुन निघुन गेलो. (साक्षीदारास घटनास्थळ पंचनामा*

*व घटनास्थळ नकाशा दाखविण्यात आला). त्या दोन्हींवर अनु. क्र. ०२ चा पंच म्हणून माझी सही आहे. मला पंचनामा व नकाशाचा मजकुर माहित नाही. मला वाचता येत नसल्याने मी तो मजकुर वाचला नाही. (साक्षीदाराने नमूद केलेल्या स्वाक्षरींना अनुक्रमे **निशाणी २२ व २३** देणेत आली).*

***(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)***

**०३**. हे म्हणणे खरे आहे की, मला व अमित भाटकर यांना पोलीसांनी सदर ठिकाणी पंचनाम्यासाठी पंच म्हणुन हजर रहा, असे बोलावले होते व पोलीसांनी तेथे पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ दत्तात्रय कोतवडेकर यांनी दाखविले होते. साक्षीदार पुढे सांगतो की, घटनास्थळ आम्हाला पोलीसांनी दाखविले होते.

**०४**. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी रस्त्याच्या कडेला अपघातग्रस्त रिक्षा उभी केलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या रिक्षाखाली एक मोटार सायकल पडली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर ठिकाणी रक्ताचे डाग पडलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी सदर ठिकाणी पंचनाम्यातील मजकुर आमच्यासमक्ष लिहुन नकाशा रेखाटला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी माझ्या ओळखीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविणेसाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे यांनी नाकारला.</u>**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.12.19 11:50:28 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दि. १८.१२.२०२५ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

## -:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date | :- | 18/12/2025 |
| Evidence signed by PO. on | :- | 18/12/2025 |
| Evidence uploaded on | :- | 19/12/2025 |